REGISTERED No. B. 3[illegible]




# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख १८ मे, १९४९ अंक २०

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें.

कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८० सदाशिव पेठ, पुणें २.

### सिंडिकेटच्या भागिदारांचे माहितीकरितां.

**ऑर्डिनरी शेअर रुपये ४२,५०,००० किंमतीचे कंपनी कायद्याचें कलम १०५सी प्रमाणें सरकारी परवानगीप्रमाणें विक्रीस काढले आहेत.**

एक हजार टनांच्या नव्या मशिनरीचे तीन हप्ते आले आहेत. साडेचार लक्ष रुपये किंमतीचा चवथा हप्ता निघाला असून तो मुंबई बंदरांत मे महिना अखेर येईल व सप्टेंबर १९४९ अखेर सर्व मशिनरी येईल.

**सात लक्ष रुपयांच्या ठेवी घेणें आहेत.**

| ठेवींची मुदत— | व्याजाचा दर— |
|---|---|
| पांच वर्षें | द. सा. द. शें. ६ ( सहा ) टक्के. |
| तीन वर्षें | द. सा. द. शें. ४ ( चार ) टक्के. |

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. तर्फे व करितां,
सी. जी. आगाशे आणि कंपनी,
मॅनेजिंग एजण्टस्.

पुणें, ता. ११ मे १९४९.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१५,१६५ |
| खेळतें भांडवल | रु. ७१,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. घों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर

श्री. सी. टी. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

## सर्व प्रसिद्ध माल

ओगले यांचीं टंब्लर्स, पेले, लेमन स्क्वीझर्स, पेट्रोमॅक्स ग्लोब्स, तांब्य भांडीं, चिमण्या, बाटल्या व शास्त्रीय उपकरणें इत्यादि कांच माल.

| | |
|---|---|
| केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें १ | केळकर बंधू, ( शाखा ) मेनरोड, नाशिक. |

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.


# विविध माहिती

**ब्रम्हदेशाला हिंदी बँकेची मदत**—ब्रम्हदेश सरकारला कलकत्ता येथें तांदुळाची पोती खरेदी करतां यावी म्हणून एका हिंदी बँकेनें ब्रम्हदेशाच्या सरकारला २ कोटी रुपयांचें कर्ज देऊं केलें आहे.

**हिंदुस्थान-फिनलंड व्यापार**—हिंदुस्थान आणि फिनलंड ह्यांच्या दरम्यान झालेल्या व्यापारी करारामुळें फिनलंडशीं होणारा हिंदुस्थानचा व्यापार ८ लाख रुपयांपासून १॥ कोटी रुपयांपर्यंत वाढेल असा अंदाज आहे. कराराची मुदत एक वर्षाची आहे. फिनलंडला तंबाखू, रबराचा माल, मसाल्याचे पदार्थ, तागाचे पदार्थ, वनस्पतींचें तेल इत्यादी माल हिंद देणार आहे. उलट फिनलंडकडून कागदाचा लगदा आणि कागद करण्याची यंत्रसामुग्री, तयार घरें, निरनिराळ्या तऱ्हेचा कागद, बॉयलर इत्यादी माल मिळणार आहे. करारांतील मालाची देवाण घेवाण शक्यतों आपल्याच बोटींतून व्हावी ह्याविषयीं उभय राष्ट्रें दक्षता घेणार आहेत. फिनलंडनें हिंदुस्थानला यांत्रिक मदत देण्याचेंही कबूल केलें आहे.

**ग्रामसुधारणेबद्दल बक्षिसें**—१९४७ मध्यें केलेल्या ग्रामसुधारणेबद्दल नगर जिल्ह्यांतील तीन गांवांना बक्षिसें देण्यांत आलीं आहेत. त्यांचा तपशील असा :—कोपरगांव तालुक्यांतील पोहेगांव २०० रुपये; नेवासें तालुक्यांतील मानस, १५० रुपये; जामखेड पेट्यांतील देवी निमगांव १०० रुपये.

**शेतकरी कर्ज कायदा**—मुंबई सरकारचा शेतकरी कर्ज विषयक कायदा ता. १ मे पासून कोल्हापूर संस्थानच्या हद्दींत जारी करण्यांत आला आहे. कर्जाचे व्यवहार ह्या कायद्याप्रमाणें बदलून घेण्यासाठी योग्य त्या कोर्टाकडे ता. ३१ आक्टोबर १९४९ पर्यंत अर्ज करावयाचे आहेत.

**जपानची लोकसंख्या**—१९४८ सालीं जपानच्या लोकसंख्येच्या वाढीनें उच्चांक गांठला. ह्या सालीं जपानमधील लोकसंख्या १०,००,००० नीं वाढली.

**इजिप्त-हिंदुस्थान व्यापारी करार**—इजिप्त आणि हिंदुस्थान ह्यांच्यांत होणाऱ्या व्यापारी करारावर लवकरच सह्या होतील. कराराप्रमाणें हिंदुस्थान इजिप्तकडून मुख्यतः कापूस विकत घेईल.

**सक्करच्या धरणाची दुरुस्ती**—सक्करच्या धरणाला पडलेल्या चिरकोळ भेगा सांधण्यासाठीं ४५,००० रुपये खर्च येईल असें समजतें. एका परकीय तज्ज्ञानें सर्वच धरण दुरुस्त करावें लागेल आणि त्यासाठीं १ कोटी रुपयांपेक्षां अधिक खर्च येईल असें मत व्यक्त केलें होतें.

**बायबलचा प्रचंड खप**—अमेरिकेंतील प्रकाशकांना असा अनुभव आला आहे कीं, बायबलच्या प्रती अजूनहि इतर पुस्तकांच्या मानानें अधिक खपतात. १९३९ सालीं ३८,००,००० बायबलच्या प्रति खपल्या होत्या. १९४७ सालीं ह्यापेक्षा जवळ जवळ अडीच पट म्हणजे ९२,४८,००० इतक्या प्रती खपल्या अशी माहिती प्रसिद्ध झाली आहे.

**ब्रिटनमधील पोलादाचा धंदा**—ब्रिटिश हौस ऑफ कॉमन्स सभेनें देशांतील लोखंडाचे आणि पोलादाचे कारखाने राष्ट्रीय मालकीचे करण्याचें बिल ३३३ विरुद्ध २०३ मतांनीं मंजूर केलें. ह्या बिलाला वरिष्ठ सभागृहांत चांगलाच विरोध होईल. वरिष्ठ सभागृहानें बिल नामंजूर केलें तरी त्याचें कायद्यांत रूपांतर होऊं शकेल; कारण कोणताही कायदा १ वर्षापेक्षां अधिक काळ लांबविण्याचा अधिकार आतां वरिष्ठ सभागृहाला नाहीं. पूर्वी ही मुदत दोन वर्षांची होती. ह्या बिलाप्रमाणें दरवर्षी ५० हजार टनापेक्षां अधिक लोखंड गाळणाऱ्या कारखान्यांचे भाग सरकार विकत घेईल. कारखाने वेगळे वेगळेच राहून भाग मात्र आयर्न अँड स्टील कॉर्पोरेशन ऑफ ग्रेट ब्रिटन ह्या मध्यवर्ती संस्थेकडे रहातील.

**मुंबई प्रांतांत ग्रामपंचायतींची वाढ**—येत्या दोन वर्षांत मुंबई प्रांतांत ५,००० पेक्षा अधिक ग्रामपंचायती कार्य करूं लागतील, असे प्रांताचे स्थानिक स्वराज्य-मंत्री श्री. वर्तक ह्यांनीं मुलाखतींत सांगितलें. श्री. वर्तक सातारा जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींच्या प्रगतीची पहाणी करण्यासाठी गेले असतां एका ग्रामपंचायतीच्या सभेला १५ हजार गांवकरी हजर असल्याचें त्यांना आढळून आलें. मुंबई सरकार खेडेगांवांतील लोकांच्या सुखसोयी वाढविण्यासाठी कसा खर्च करीत आहे हें सांगतांना श्री. वर्तक म्हणाले कीं, स्थानिक स्वराज्य संस्थांना रस्ते करण्यासाठी मदत म्हणून १८,७१,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. प्राथमिक शिक्षणावर सर्व लोकल बोर्डस मिळून ३५,००,००० रुपये खर्च करीत असत. चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत सरकारनें ५॥ कोटी रुपयांची रकम प्राथमिक शिक्षणासाठीं काढून ठेवलेली आहे.

**प्रभात बँकेची मुंबई शाखा**—१०८ मेडोज, स्ट्रीट मुंबई येथें असणारी प्रभात बँकेची शाखा ता. २८ मे १९४९ पासून बंद करण्यांत येणार आहे असें बँकेनें आपल्या खातेदारांना कळविलें आहे. त्या तारखेपासून सर्व हिशेब प्रभात बँक लि., चांदणी चौक दिल्ली येथें बदल करण्यांत येणार आहेत.

**अन्नधान्याची वसुली**—अन्नधान्याच्या वसुलीसंबंधी हिंद सरकारच्या अन्नखात्यानें पुढील आकडे प्रसिद्ध केले आहेत. १९४८ मध्यें एकूण २४,८४,००० टन धान्य वसूल करण्यांत आलें. ह्या वर्षी आतांपर्यंत १८,४२,२०० टन अन्नधान्याची वसुली झाली आहे. परदेशांतून आयात झालेलें अन्नधान्य खरेदीच्या किंमतीपेक्षा कमी दरानें ग्राहकांना देतां यावें म्हणून हिंद सरकारला १९४८-४९ सालीं २६,५२,००,००० रुपये आर्थिक मदत द्यावी लागेल असा अंदाज आहे.

**पाकिस्तानांतील मोटारींचा विमा**—ता. १ मेपासून पाकिस्तानांतील मोटारींच्या सर्वसंग्राहक विम्याचे हप्ते ५० टक्क्यांनीं वाढविण्यांत आले आहेत. सध्यां मोटारींच्या अपघातांचें प्रमाण वाढल्यामुळें विमा कंपन्यांना चालू दर परवडत नाहींत. ज्या विमा कंपन्या मध्यवर्ती संघटनेंत सामील नाहींत त्या नवीन वाढलेल्या दरानें विमा उतरण्यास नाखूष असलेल्या मोटारवाल्यांचे विमे बळकाऊन बसतील, अशी भीति व्यक्त करण्यांत येत आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १८ मे १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद् वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## शेड्यूल्ड बँकांनीं दिलेलीं कर्जें

### रिझर्व्ह बँकेनें एकत्रित केलेल्या आंकड्यांपासून बोध

शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जाची पहाणी रिझर्व्ह बँकेनें १९४८ मध्यें केली, तिची कल्पना देणारी थोडीशी माहिती रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बुलेटिनच्या ताज्या अंकांत प्रसिद्ध झाली आहे. कारखाने व व्यापार ह्यांस बँकांची मदत कितपत होते, हें ह्या पहाणीवरून समजून येईल. एकूण ९९ शेड्यूल्ड बँकांचे दोन वर्ग करण्यांत आले:–( अ ) ज्यांनीं दिलेलीं कर्जें ५ कोटी रुपयांचेवर आहेत अशा बँका, ( ब ) बाकीच्या बँका. ३०–४–१९४८ रोजीं एकूण १८ बँका ( अ ) ह्या वर्गांत होत्या, त्यांचे आणि बाकीच्या पैकीं २४ बँकांचे ३०–६–४८ चे आकडे रिझर्व्ह बँकेनें एकत्रित केले. शेड्यूल्ड बँकांनीं एकूण दिलेल्या कर्जापैकीं ७७·४% कर्जें वरील ( अ ) १८ बँकांनीं दिलेलीं होतीं.

( १ ) कारखानदारी, ( २ ) व्यापार, ( ३ ) वैयक्तिक व ( ४ ) व्यावसायिक आणि इतर, अशा चार प्रकारच्या कर्जांत एकूण कर्जांची विभागणी करण्यांत आली. त्यावरून असें दिसून आलें कीं, प्रत्येक कर्जाची सरासरी रक्कम ३०,००० रु. होती. तारणावर दिलेल्या प्रत्येक कर्जाची सरासरी जास्त भरली. कारखान्यांना दिलेल्या प्रत्येक कर्जाची सरासरी रक्कम ३,५०,००० रु. होती. वैयक्तिक कर्जाची सरासरी रक्कम ६,००० रु. भरली. कारखान्यांचे गटांत साखर आणि ताग ह्यांना दिलेल्या कर्जाची सरासरी रक्कम १० लक्ष रुपयांपेक्षां जास्त होती.

कर्जाची वांटणी

| | लक्ष रु. | एकूण कर्जाशीं प्रमाण% |
|---|---|---|
| कारखाने | ११५,२८ | ३०·३८ |
| व्यापार | २०१,६३ | ५३·१४ |
| वैयक्तिक व व्यावसायिक | ३१,४० | ८·२८ |
| इतर | ३१,१३ | ८·२१ |

व्यापारासाठीं दिलेलीं कर्जेंच जास्त होतीं, असें हा तक्ता दर्शवितो. दिलेल्या कर्जापैकीं ८८% कर्जें तारणावर दिलेलीं होतीं.

तपासणीमधील बँकांनीं ३७९ कोटी रुपयांचीं कर्जें दिलेलीं होतीं; त्यांचें त्या बँकांच्या एकूण ठेवींशीं प्रमाण ४४·८% पडतें. गेल्या युद्धापूर्वी, शेड्यूल्ड बँकांनीं दिलेलीं कर्जें त्यांच्या ठेवींच्या ५०% च्या आसपास असत. १९४०–४१ पासून हें प्रमाण उतरत जाऊन १९४२–४३ मध्यें तें २३·८३% वर आलें. परंतु तेव्हांपासून कर्जांचें प्रमाण वाढत चाललें आणि २६-३-१९४८ रोजीं तें ४५·७२% झालें. ३१–१२–४८ रोजीं तें प्रमाण ४५·९०% होतें व २५–३–४९ रोजीं ५४·२१% वर गेलें आहे. मोठ्या बँकांचे पेक्षां लहान बँका ठेवीच्या अधिक प्रमाणांत कर्जें देतात, असा अनुभव आहे. त्याचप्रमाणें, मोठ्या बँका कारखान्यांना मोठीं कर्जें देतात, तर लहान बँकांनीं दिलेल्या कर्जांत वैयक्तिक कर्जाचा भरणा मोठा असतो.

कर्जाची शतमानानें छाननी

| कर्जाचा प्रकार | १८ मोठ्या बँका | | निवडक २३ लहान बँका | |
|---|---|---|---|---|
| | कर्जाची संख्या (%) | कर्जाची रक्कम (%) | कर्जाची संख्या (%) | कर्जाची रक्कम (%) |
| औद्योगिक | ३·९९ | ३१·४९ | ०·८९ | १६·७६ |
| व्यापार | ४३·६२ | ५२·५९ | ४१·८९ | ५९·८६ |
| वैयक्तिक | ४०·६५ | ७·५१ | ४५·२२ | १७·६४ |
| इतर | ११·७४ | ८·४१ | १२·०० | ५·७४ |
| एकूण | १००·०० | १००·०० | १००·०० | १००·०० |
| विना तारण | १६·२८ | ११·५५ | १३·७३ | १९·३४ |
| तारणावर | ८३ ७२ | ८८·४५ | ८६·२७ | ८०·६६ |

## मुंबई प्रांतातील सहकारी ग्रामोद्योग

मुंबई सरकारनें ग्रामोद्योगांच्या वाढीसाठीं मध्यवर्ती कायदेमंडळाचे एक सभासद श्री. मनु सुभेदार ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली होती. कमिटीनें ग्रामोद्योगांच्या वृद्धीसाठीं प्रांतिक आणि जिल्हा बोर्डस् स्थापन करावीत असें सुचविलें होतें. मुंबई सरकारला अशा बोर्डांची जरूरी वाटली नाहीं. त्या ऐवजीं सरकारनें एप्रिल १९४७ मध्यें सरकारी आणि बिनसरकारी सभासद असणारी एक कमिटी ह्या कार्यासाठी नेमली. कमिटींतील सभासद पुढीलप्रमाणें होते. ( १ ) रजिस्ट्रार ऑफ कोऑपरेटिव्ह सोसायटीज ( अध्यक्ष ) ( २ ) जॉइंट रजिस्ट्रार, इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज अँड व्हिलेज इंडस्ट्रीज, (सेक्रेटरी) ( ३ ) डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज ( ४ ) चेअरमन, व्हिलेज इंडस्ट्रीज कमिटी, मुंबई ( ५ ) चेअरमन प्रॉव्हि. इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्ह असोसिएशन लि., मुंबई. कमिटीवर एक अगर दोन तांत्रिक तज्ज्ञ नेमून घेण्याचा अधिकार अध्यक्षांना देण्यांत आला होता. कमिटीकडे वरीलपैकीं दोन आणि चार अनुक्रमाच्या संस्थांकडून आणि व्हिलेज इंडस्ट्रीज कमिटीकडून त्रैमासिक अहवाल पाठविण्यांत येतात. ह्या अहवालांच्या आधारें ३० सप्टेंबर १९४८ पर्यंतची माहिती संग्रहित करणारें पुस्तक प्रॉ. इं. को. असोसिएशननें प्रसिद्ध केलें आहे.*

### सहकारी खात्याचा ग्रामोद्योग विभाग

उत्पादनाची पद्धत सुधारण्यासाठी आणि अधिक सुधारलेलीं हत्यारें वापरण्यासाठी कारागिरांना शिक्षण देणें जरूर होतें म्हणून विविध प्रकारच्या ग्रामोद्योगांची प्रात्यक्षिकें दाखविणें, फिरत्या

* "इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्हज अँड व्हिलेज इंडस्ट्रिज इन बॉंबे प्रॉव्हिन्स" संपादक व प्रकाशक: एल. एन. रेणु, सेक्रेटरी, प्रॉ. इं. को. अ. लि., किं. १ रु. ४ आ.

शाळा ठेवणें, ह्यांचा उपयोग करण्यांत आला. कारागिरांना आर्थिक मदत आणि शिष्यवृत्त्या मंजूर करण्यांत आल्या. मागच्या अनुभवावरून असें दिसून आलें होतें कीं प्रात्यक्षिकें करून दाखविणाऱ्या संघटनांची आणि शाळांची पुनर्घटना करणें जरूर आहे. त्यासाठीं इंडस्ट्रिज् कोऑ. अँड व्हिलेज इंडस्ट्रीजचे जॉइंट रजिस्ट्रार ह्यांनीं एप्रिल १९४७ मध्यें तंत्रज्ञ नोकरांची एक परिषद् भरविली. परिषदेनें असा निर्णय घेतला कीं प्रात्यक्षिकें दाखविणाऱ्या संघटनांचें फिरत्या शाळांत रूपांतर करावें. वरील खात्यातर्फे विविध प्रकारच्या ग्रामोद्योगांना उपयोगी पडणारें शिक्षण देण्यासाठीं ५७ संस्था चालविण्यांत आल्या. ह्या संस्थांतून वंशपरंपरेनें एकच काम करणारे कारागीर आणि इतर कामगार ह्यांना शिक्षण देण्यांत येत होतें. मागासलेल्या वर्गासाठीं म्हणून १४ फिरतीं प्रदर्शनें आणि शाळा चालविण्यांत आल्या. ह्या ५७ संस्थांत पुढीलप्रमाणें उद्योगधंद्यांच्या शाळा होत्या. ६ शाळा लोकरीचें कापड विणण्याच्या; १६ कापसाचें कापड विणण्याच्या; ३ शाळा कापड रंगविणें आणि त्यावर वेलबुट्टी काढण्याच्या; ५ शाळा काथ्याचें काम शिकविणाऱ्या; ७ शाळा चामडी कमावण्याच्या; २ शाळा कातड्याच्या वस्तू तयार करण्याच्या; ६ शाळा लाखेचें काम शिकविणाऱ्या; ६ शाळा वेताचें आणि बांबूचें काम शिकविणाऱ्या; १ लोहार काम आणि सुतारकाम शिकविणारी; १ मातीची भांडीं करणारी; १ बांगड्या तयार करणारी; १ तेलाचे घाणे चालविणारी; १ कलाकुसरीचें काम शिकविणारी आणि रेशमाचा धंदा शिकविणारी. निरनिराळ्या ग्रामोद्योगांत शिक्षणाचा काळ ६ महिन्यांपासून २ वर्षेपर्यंत असतो. ३० सप्टेंबर १९४८ पर्यंत ३२४ विद्यार्थी शिकून तयार झाले; त्यावेळीं आणखी ५०० विद्यार्थी शिक्षण घेत होते.

सहकारी खात्यातर्फे प्रयोग आणि संशोधन ह्यांच्याकडे विशेष लक्ष पुरविण्यांत येतें. पुणें येथें ग्रामोद्योगासंबंधीं प्रयोग करणारें एक छोटें वर्कशॉप त्यासाठीं मुद्दाम चालविण्यांत येत आहे. रसायन विषयांत संशोधन करण्यासाठींहीं एक प्रयोगशाळा उभारण्यांत आली आहे. प्रयोगशाळा एप्रिल १९४८ मध्यें स्थापन करण्यांत आली. ग्रामोद्योगाचें कार्य करणाऱ्या शाळा आणि प्रात्यक्षिकें दाखविणाऱ्या संघटना कारागिरांना शिक्षण देत असतात. त्यांचें कार्य नीट चालावें म्हणून १६ जिल्हाधिकारी नेमण्यांत आले आहेत. मनु सुभेदार कमिटीनें शिफारस केल्याप्रमाणें, खेडेगांवच्या लोकांना रोजगार मिळावा म्हणून १२ औद्योगिक केंद्रांच्या योजना सरकारनें सहकारी खात्याकडून मागविल्या होत्या. त्याप्रमाणें सरकारला ८ योजना सादर करण्यांत आल्या. त्यापैकीं ४ योजनांना सरकारनें मंजुरी दिली. आतां हीं चार केंद्रें सातारा, विजापूर, नगर आणि सोलापूर जिल्ह्यांत चालू करण्याविषयीं व्यवस्था करण्यांत येत आहे. प्रत्येक जिल्ह्यांत दोन किंवा तीन ग्रामोद्योग विशेष लक्ष देऊन काढण्याचा सहकारी खात्याचा विचार आहे. ह्या कार्यांत जिल्ह्यांतील सरकारी आणि बिन सरकारी कार्यकर्त्यांची सल्लामसलत घेण्यांत येईल. ह्या धोरणाप्रमाणें अशा कार्यकर्त्यांच्या जिल्हा परिषदा घेण्यांत आल्या; व त्यांतून कांहीं योजना ठरविण्यांत आल्या. पश्चिम खानदेशांत १० तेलाच्या घाण्या चालू करण्याविषयीं सरकारला शिफारस करण्यांत आली होती. ह्या योजनेला सरकारनें मंजुरी दिली आहे. धारवाड आणि बेळगांव जिल्ह्यांत रेशमाचा धंदा करता येण्यासारखा आहे. रेशमाचे किडे तुतीचीं पानें खातात म्हणून तुतीच्या झाडांची लागवड आणि किड्यांचें पालन-पोषण ह्यासंबंधीं प्रात्यक्षिकें दाखविणें जरूर वाटतें. अशीं चार केंद्रें स्थापन करण्याविषयीं सरकारला सुचविण्यांत आलें. सरकारनें ह्या केंद्रांना मान्यता दिली आहे.

## दि सांगली बँक लि., सांगली

### (वार्षिक सभाः २९-४-४९)

वरील बँकेचें वसूल भांडवल ३ लक्ष रुपये असून तिचे रिझर्व्ह ३,००,५०१ रुपयांचे वर आहेत. ठेवी सुमारें ८४ लक्ष रुपयांच्या आहेत. बँकेनें २१३⁄४ लक्ष रु. रोख व बँकांत ठेवले असून तिची ३३३⁄४ लक्ष रुपयांची इनव्हेस्टमेंट आहे. दिलेल्या कर्जाची रक्कम ३४ लक्ष, ८५ हजार रुपये आहे. अहवालाचे वर्षी (१९४८) बँकेस १,०२,००९ रु. नफा झाला. जनरल रिझर्व्ह ५,००० रु., चॅरिटी फंड १,१०० रु., कर रिझर्व्ह ४०,००० रु., कॉन्टिन्जन्ट फंड १०,००० रु. असा विनियोग करून ११३⁄४% दरानें करमाफ डिव्हिडंड देण्याकडे ३४,५०० रुपयांचा विनियोग करण्यांत आला. सांगली संस्थान मुंबई प्रांतांत अहवालाचे वर्षीं विलीन झालें, तेव्हां डायरेक्टरांनीं आपल्या अहवालांत श्रीमंत राजेसाहेबांच्या उत्साहक मार्गदर्शनाबद्दल आभार मानण्यांत औचित्य दाखविलें आहे. म. गांधी फंडास ३ हजार रु. देणगी देण्यांत आली आहे. बँकेच्या ११ शाखा आहेत व मुख्य कचेरी सांगली येथें आहे. बँकेची भक्कम परिस्थिति व पैशाचा तरतेपणा ताळेबंदावरून सहज दिसून येतो. रावसाहेब एच. बी. कुलकर्णी हे डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन असून श्री. पी. एस. मोकाशी हे मॅनेजर आहेत.

### कापडाच्या उत्पादनांत घट

१९४९ सालांतील पहिल्या तीन महिन्यांतील कापडाचें उत्पादन, दर महिन्या मागें सरासरी ३ कोटींनीं कमी झालें आहे, असें गेल्या वर्षांतील पहिल्या तीन महिन्यांतील सरासरी उत्पादनाशीं तुलना करतांना आढळून आलें आहे. सुताचें उत्पादन मात्र समाधानकारक आहे. मुंबईच्या 'टाइम्स' पत्राच्या प्रतिनिधीनें गोळा केलेली माहिती पुढें दिली आहे.

उत्पादनाचे आंकडे

| वर्ष | सूत (आकडे कोटी पौंडाचे) | कापड (आकडे कोटी वाराचे) |
|---|---|---|
| १९४५ | १,६२ | ४,६८ |
| १९४६ | १,३९ | ४,०० |
| १९४७ | १,३१ | ३,८३ |
| १९४८ | १,४४ | ४,३१ |
| १९४८ (मासिक सरासरी) | १२ | ३६ |
| १९४९ | | |
| जानेवारी | १२ | ३४ |
| फेब्रुवारी | ११ | ३१ |
| मार्च (अंदाज) | १२ | ३३ |

**जर्मन मालाची स्पर्धा**—जर्मन आणि ब्रिटिश निर्यात मालाची तीव्र स्पर्धा येत्या कांहीं वर्षांत पुन्हा सुरू होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या स्पर्धेत ब्रिटन किनपत टिकाव धरूं शकेल ह्याबद्दलचा अभ्यास अर्थशास्त्रज्ञांनीं नुकताच पुरा केला आहे. सध्यां मात्र जर्मन मालापेक्षां ब्रिटनचा माल स्पर्धेमध्यें टिकून आहे. गेल्या वर्षीं ब्रिटननें आणि अमेरिकेनें व्यापलेल्या जर्मनीच्या भागांतून १५ कोटी डॉलर्सचा माल निर्यात करण्यांत आला. ह्या वर्षी ४० कोटींचा माल निर्यात करण्यांत यावयाचा आहे; आणि पुढें प्रत्येक वर्षी निर्यात १० कोटी डॉलर्सनीं वाढविण्यांत येणार आहे.

## पेट्रोलचा खप व पुरवठा

आंतरराष्ट्रीय व्यापारांत पेट्रोल आणि त्यापासून बनविण्यांत येणारे पदार्थ, ह्यांचा भाग एकूण किंमत आणि आकारमान ह्या दोन्ही दृष्टींनीं सर्वांत मोठा आहे. सर्व जगाला रोज सुमारें १० लाख टनावर पेट्रोल लागतें. जगांत निरनिराळ्या स्वरूपांत जी प्रेरक शक्ती लागते त्यापैकीं ७ टक्के शक्ति पहिल्या महायुद्धापूर्वी पेट्रोलपासून तयार होत असे. आतां पेट्रोलपासून उत्पन्न होणाऱ्या शक्तीचें प्रमाण ३० टक्क्यापेक्षांही अधिक झालें आहे. १९५२ च्या सुमारास जगांतील देशांना रोज १५ लाख टन पेट्रोल अगर तद् साधित पदार्थ लागतील असा अंदाज आहे.

एकंदर पुरवठ्यांत ब्रिटनच्या मालकीच्या तेलाच्या खाणींना बरेंच महत्त्व आहे आणि हें महत्त्व वाढण्याचाच संभव अधिक दिसतो. कारण, एका काळीं पेट्रोलची निर्यात करणारी अमेरिका आतां तेल आयात करीत आहे व करीत राहील असें दिसतें. दुसरें असें कीं, शेती आणि उद्योगधंदे ह्यांना लागणारी प्रेरक शक्ती इतर साधनांच्या अभावीं पेट्रोलपासूनच अधिकाधिक मिळविली जात आहे. अर्थात पेट्रोलची बाजार पेठ वाढती आहे. शेती यांत्रिक पद्धतीनें करण्यांत येऊं लागली आहे. आरमारेंही जळणासाठी पेट्रोलचा अधिक वापर करूं लागलीं आहेत. विमान वहातुकीला पेट्रोल लागतेंच; शिवाय आधुनिक लष्कर हें गतिमान असल्यामुळें त्यासही पेट्रोलचा भरपूर सांठा करून ठेवणें अवश्य असतें. दुसऱ्या महायुद्धापूर्वी जगाच्या पेट्रोलच्या पुरवठ्यापैकीं १/२ पुरवठा ब्रिटिश कंपन्यांच्या हातीं होता. १९४८ सालांतही, अडचणींना दाद न देतां एकूण साठ्याच्या १/२ सांठा ब्रिटिश कंपन्यांच्या हातीं आला. ब्रिटिश कंपन्यांना मिळालेल्या तेल काढण्याच्या सवलती कॅरीबिअन बेटें, इराण, इजिप्त, ब्रम्हदेश इत्यादी देशांवर पसरलेल्या आहेत. भौगोलिक दृष्टीनें विचार करतां जगाच्या पश्चिम गोलार्धांत एकूण उत्पादनापैकीं ३/४ पेट्रोल निघतें. त्यापैकीं अमेरिका ३/४ उत्पादन करते. दक्षिण अमेरिका व कॅरिबिआंतील ब्रिटिश कंपन्या १/५ उत्पादन करतात. बाकीचें तेल मध्यपूर्वेतील देशांत उत्पादन केलें जातें.

कांहीं तज्ज्ञांचे मतें पृथ्वीच्या पोटांतील तेल हल्लीं इतक्या जलद उपसलें जात आहे कीं त्याचा साठा लवकरच संपुष्टांत येण्याचा संभव अगदी नजीक आला आहे. जगांतील एकूण तेलाचा साठा ७,००० कोटी पिपें ( १ पीप = ५ घनफूट ) असावा ह्या अंदाजानें दहा वर्षांत दरवर्षी ३०० कोटी पिपें तेलाचा खप होईल. ह्या हिशेबानें पेट्रोलचा पुरवठा २३ वर्षांत संपेल असें त्यांचें म्हणणें आहे. तथापि ह्या हिशेबांत तेलाचा अज्ञात साठा जमेला धरण्यांत आलेला नाहीं. भूगर्भांतीलच नव्हे तर समुद्राच्या तळाशीं असलेले तेलाचे सांठे उघडकीला येत आहेत. शिवाय कोळशापासून पेट्रोल उत्पन्न करतां येतेंच. कोळशापासून पेट्रोल तयार करण्याच्या माहीत असलेल्या कृतीचा उपयोग केला, तरी सुद्धा ब्रिटनला कांहीं शतकें पेट्रोलचा तुटवडा पडणार नाहीं. मध्यपूर्वेतील तेलाच्या खाणींपेक्षां पश्चिम गोलार्धांतील तेलाच्या खाणी लवकर कोरड्या पडण्याचा अधिक संभव आहे. मध्यपूर्वेत एकंदर तेलाच्या शिल्लक सांठ्यापैकीं २/३ सांठा आहे, म्हणून येत्या कांहीं वर्षांत मध्यपूर्वेतील देशांत पेट्रोल अधिक उत्पन्न केलें जाईल.

ब्रिटिश कॉमनवेल्थ ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या राष्ट्रगटांत पेट्रोलचा खूप खप होतो. ह्या गटापेक्षां अधिक खप फक्त अमेरिकेंतच होतो. १९४७ सालीं 'कॉमनवेल्थ' गटांत ४,५०,००,००० टन पेट्रोल खपलें. त्यापैकीं १,६०,००,००० टन पेट्रोल ब्रिटननें पुरविलें. ह्या गटाबाहेरच्या देशांतहि त्याच्या खाणी उघडण्याचा प्रयत्न ब्रिटिश कंपन्या करीत आहेतच; पण, त्याचबरोबर सध्या चालू असलेल्या खाणींतूनही अधिक तेल काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. शिवाय आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलँड, कॅनडा इत्यादी साम्राज्यांतर्गत देशांतून नवे तेलाचे साठे शोधण्याची खटपट चालू आहे. खुद्द इग्लंडमध्यें तेल सांपडल्यामुळें यॉर्कशायरमध्यें त्यासाठीं अधिक संशोधन करण्यांत येत आहे. एका ब्रिटिश कंपनीला १६९ चौरस मैलांच्या प्रदेशांत तेलासाठी उत्खनन करण्याचा परवाना नुकताच मिळाला आहे.

## दिरंगाईचा दुष्परिणाम

### सिंद्रीच्या कारखान्यानें शिकवलेला अनुभव

सिंद्री ( धनबाद ) येथें हिंदुस्थान सरकार जिप्सम पद्धतीनें अमोनियम सल्फेट उत्पादन करणारा कारखाना उभारीत आहे. नैट्रेट किंवा क्लोराइड न करतां, सल्फेट करण्याचें ठरविण्यांत आलें, सिंद्री येथें एकच मोठा कारखाना काढण्याचें निश्चित झालें, इत्यादि गोष्टी अनुकूल असल्या तरी जागा मिळविणें, इत्यादि गोष्टींत फार वेळ जाऊन कारखान्याच्या उभारणीस वेळ लागत चालला आणि त्याचा अंदाजी खर्चहि वाढून तो १०१/२ कोटी रुपयांचा आतां १७ कोटी रुपयांवर गेला आहे. उत्पादन खर्चहिं सहाजीकच वाढणार आहे, हें खालील तुलनात्मक तक्ता दर्शवील:—

दरसाल ३,५०,००० टन सल्फेट ऑफ अमोनिया तयार करण्याचा अंदाजी खर्च

| | गोविंग मिशनचा १९४४ चा अंदाज दर टनी किंमत (रु.) | दुरुस्त अंदाज दर टनी किंमत (रु.) |
|---|---|---|
| कोळसा—२,४९,००० टन | ८.९ | ११.६५ |
| कोक—१,७८,००० टन | १६.६ | २१.६५ |
| जिप्सम—५,३६,००० टन | ३६.१ | ६१.२६ |
| इतर बाबी | | |
| मजुरी, देखरेख | ६.२ | ९.३ |
| वीज | १.४ | २.१ |
| पॅकिंगचें साहित्य | ८.५ | १२.७७ |
| उत्पादन खर्च | ८९.९ | १५१.०३ |
| इतर खर्च | | |
| व्याज ( कारखाना ) | ११.३ | १६.:९ |
| घसारा ( कारखाना ) | १६.६ | २४.९ |
| हौसिंग ओव्हरहेड्स | १.१ | १.६७ |
| एकूण उत्पादन खर्च एफ. ओ. आर. फॅक्टरी | ११८.९ | १८०.४९ |

१९४५ सालींच यंत्रसामुग्रीची ऑर्डर दिली गेली असती, तर घसाऱ्याचा खर्च ३०% कमी आला असता, आणि योजना तातडीनें पुरी केली असती तर उत्पादन खर्चांत १० ते १५% बचत झाली असती, असा अंदाज आहे. ह्या महाग उत्पादन खर्चाचा परिणाम दूरगामी झाल्याविना रहाणार नाहीं. सिंद्री कारखान्याच्या बाबतींत आलेल्या अनुभवापासून धडा घेतला जाईल व इतर बाबतींत अधिक दक्षता बाळगली जाईल अशी अपेक्षा आहे.

## सेव्हिंग्ज बँक चेकवरील खातें नंबर

### चेक परत करण्याची बँकांची अयोग्य पद्धति

( लेखक:–डॉ. व्ही. के. कृष्णन्, बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणें )

बँका व त्यांचे खातेदार ह्यांचे परस्पर संबंध ऋणको व धनको ह्यांच्या संबंधाप्रमाणें समजले जाण्याची आधुनिक पद्धत आहे. त्याबरोबरच खातेदाराचे खात्यावर रकम शिल्लक असेल तर खातेदारानें काढलेले चेक स्वीकारण्याची विशेष जबाबदारी बँकेवर असते. ह्यासाठीं बँकेवर चेक काढतांना खातेदारानें योग्य ती दक्षता घेणें आवश्यक असते हें उघड आहे. चेक काढण्यांत दोष राहून गेला तर त्या चेकप्रमाणें पैसे दिल्याबद्दल बँक जबाबदार असत नाहीं. खातेदाराला आपलें नुकसान सहन करावें लागतें. त्याचप्रमाणें खातेदारानें पैसे देण्याबद्दल आदेश स्पष्टपणें दिला असून बँकेनें अन्यायानें पैसे देण्यांत कसूर केली तर त्यापासून खातेदाराची होणारी नुकसानी बँकेला सहन करणें भाग होतें.

अशा परिस्थितींत, खातें नंबर लिहिला नाहीं ह्या सबबीवर सेव्हिंग्ज खात्यावरील चेक न वटवतां परत करण्याची बँकांची पद्धति अप्रशस्त वाटते. चेकांच्या रूपानें देण्याघेण्याचे व्यवहार करण्याची इष्ट पद्धत प्रसार पावण्याला ह्यामुळें अडथळा येणार आहे. सेव्हिंग्ज खात्यांना चेक काढण्याचा अधिकार असणें हा प्रघात हिंदुस्थानांत विशेष रूढ झाला आहे व इथेंहि तो फक्त कांहीं थोड्या प्रगमनशील बँकांतच उपलब्ध आहे. त्यामुळें सेव्हिंग्ज खात्यामधील रकमा वरचेवर काढल्या जाऊं नयेत व त्या खात्यांचें मूळ सेव्हिंग्ज हें रूप बदलूं नये म्हणून कांहीं बंधनेंहि घातलेलीं असतात. व्यवहारतः मात्र सेव्हिंग्ज खातें म्हणजे गरिबाचें 'करंट' खातें असाच संकेत ठरून गेलेला असून ह्या दोन खात्यांतील तात्विक फरक फारच कमी होऊन गेला आहे. सेव्हिंग्ज खात्यावरचा व करंट खात्यावरचा असे दोन्हीहि प्रकारचे चेक व्यवहारांत सारखेच कार्यक्षम ठरले असून केवळ करंट खात्यावरील चेकवर कांहीं मामुली जादा नोंदी असतात ह्यापलीकडे ह्या दोन चेकसमध्यें कांहींहि फरक राहिलेला नाहीं.

चेक म्हणजे खातेदारानें बँकेला आपल्या खात्यांतून विशिष्ट रकम यावयास दिलेला आदेश. तेव्हां सेव्हिंग्ज खात्यावरील चेकवर खातेनंबर घालणें हें खातेदाराचें कर्तव्य ठरतें काय ? असा प्रश्न उद्भवतो. निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस् ॲक्ट मध्यें अगर अन्यत्रहि कोठें कायद्यानें खातेदारांवर हें कर्तव्य लादलेलें नाहीं. चेकमधील आदेश हा स्पष्ट, निःसंदिग्ध व पूर्ण असावा असें न्यायकोर्टांचेंहि निर्णय आहेत. परंतु म्हणून चेकवर खातेनंबर असावा; त्याशिवाय चेकमधील आदेश पूर्ण होत नाहीं, असें केव्हांहि म्हणतां येणार नाहीं. म्हणून तत्त्वत: सेव्हिंग्ज खात्यावरील चेकसुद्धां खातेनंबर न घालतां, अथवा खातेनंबर लिहिण्यांत राहिलेली चूक दुरुस्त करतांना त्या ठिकाणीं अक्षरी ( इनीशल्स ) न करतां, चेक काढणें ह्याला कायद्यांत कोठेंहि बंदी नाहीं. असे चेक वटवण्यास बँकांनीं नकार देणें व ते चेक परत करणें अयोग्य होय. ह्याबाबत जरूर तर रिझर्व्ह बँकेनें इतर बँकांना स्पष्ट हुकूम यावयासहि हरकत नाहीं.

"व्यापार"


उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

**ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.**

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादींसाठीं चौकशी करा:—

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५१९

**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**

( १ ) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज ( ले.:–जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ. )
( २ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन ( ले.:–जे. बी. टेलर, किं. १ रु. )
( ३ ) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट ( ले :–. रेवि ॲले, किं. २ रु. )
( ४ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज ॲंड व्हिलेज इंडस्ट्रीज इन बॉंबे प्रॉव्हिन्स ( ले.:– एल. एन. रेणु, किं. १ रु. ४ आ. )

**दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड**

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. वि. केळकर M. A., LL. B (वकील) ( अध्यक्ष ) | श्री. बी. बी. वाळवेकर ( उपाध्यक्ष )

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५

एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B. } मॅनेजिंग डायरेक्टर.
श्री. नी. ना. क्षीरसागर

## परदेशी मालाच्या मारक स्पर्धेचा दुष्परिणाम

### आयात नियंत्रणाचा फेरविचार करविण्यासाठी निवेदन. मराठा चेंबरची विनंति

गेल्या कांहीं महिन्यांत परदेशी मालाची आयात फार मोठ्या प्रमाणावर झाली. त्यामुळें आयात-निर्गत विषयक ताळेबंदांतील तूट वाढत चालली आहे. यासाठीं आयातीवर निर्बंध घालणें सरकारास जरूर वाटलें व त्यांनीं ओपन जनरल लायसेन्स नंबर ११ हा तहकूब ठेवला आहे व त्यामधील यादीची तपासणी चालू आहे.

परदेशी मालाची आयात वाढून त्याची मारक स्पर्धा हिंदी उद्योगधंद्यांना—विशेषतः लहान—तापदायक झाल्याच्या अनेक तक्रारी आहेत. महाराष्ट्रांतील उद्योगधंदे हे प्रधानतः लहान असल्यानें त्यांचे भवितव्याच्या दृष्टीनें सदर प्रश्न अतिशय जिव्हाळ्याचा आहे. आज सरकार या प्रश्नाचा फेरविचार करीत आहे. त्यावेळीं सर्व लहान मोठ्या कारखानदारांच्या वतीनें मराठा चेम्बर सरकारकडे या प्रकरणीं निवेदन पाठविणार असून याकामीं संबंधी लोकांकडून जेवढी साधार माहिती मिळणें शक्य आहे तेवढें आवश्यक आहे. तरी महाराष्ट्रांतील लहान-मोठ्या कारखानदारांनीं परदेशी मालाच्या मारक चढाओढीबद्दल खालील प्रश्नांचीं सप्रमाण उत्तरें चेंबरकडे पाठवावी म्हणजे त्यांच्या आधारें चेंबरला आपलें निवेदन जास्तींत जास्त प्रभावी करतां येईल.

**प्रश्नावली**

अकराव्या ओपन जनरल लायसेन्सच्या यादीमधील कोणत्या वस्तूंच्या आयातीचा आपल्या धंद्यावर परिणाम होतो? आपल्या धंद्याचा कच्चा माल कोणता? त्यापैकीं कोणता आपण आयात करतां? त्यांची आयात अकराव्या खुल्या लायसेन्सखाली आहे कां? आपल्या कच्चा मालांपैकीं हिंदुस्थानांत कांहीं मिळतो का? किंवा तयार होतो का? आपण कोणता पक्का माल तयार करतां? तुमच्या मालाशी स्पर्धा करण्यासाठीं तत्सम वस्तूंची खुली आयात होते कां? अशा खुल्या आयातीचा आपल्या धंद्यावर काय परिणाम झाला आहे? ३ जुलै १९४८ पूर्वी व एप्रिल १९४९ मध्यें आपण तयार करीत असलेल्या मालाची घाऊक विक्रीची किंमत काय? आयात केलेल्या तत्सम परदेशीय मालाची एप्रिल १९४९ च्या सुमारास असलेली घाऊक विक्रीची किंमत काय? आपल्या मालाशीं स्पर्धा करणाऱ्या परदेशीय मालांची आयात संपूर्ण बंद करावी किंवा कांहीं प्रमाणांत येऊं द्यावी, यापैकीं आपणांस काय वाटतें? संपूर्ण बंदी घातली तर हिंदुस्थानांत सदर मालाचे देशाची अंतर्गत गरजा संपूर्ण भागविण्याइतकें उत्पादन होतें का? आपल्या धंद्याची एखादी स्वतंत्र संघटना आहे का? असल्यास ती आपल्या सदस्यासाठीं किमान विक्रीची किंमत ठरवून देते का?

## सहकारी साखर–कारखाना

### बागायतदार्स को. शुगर प्रोड्यूसर्स सोसायटी लि. (लोणी बु., जिल्हा अहमदनगर)

वरील सोसायटी साखरेचें उत्पादन करण्यासाठी स्थापन झाली आहे. साखर कारखान्याचा हा पहिलाच मोठा सहकारी प्रयत्न आहे. सोसायटीचे चेअरमन प्रा. धनंजयराव गाडगीळ हे आहेत. डायरेक्टर बोर्डांत श्री. वा. पुं. वर्दे, श्री. विखे, श्री. ज्योतींद्र एल्. मेहता, डॉ. र. गो. काकडे इत्यादि असून एकूण बोर्ड १३ सभासदांचा आहे व सबंध बोर्ड ३ वर्षांसाठी सरकारनें नेमलेला आहे. सोसायटीचें भांडवल ५ लक्ष रु. राहील व मुंबई सरकारहि त्यास कांहीं भांडवल पुरवील, असें समजतें. येत्या मोसमांत साखर करण्याचा सोसायटी प्रयत्न करणार आहे, असेंहि कळतें.

## शेतकरी कर्जनिवारण कायदा व सावकारी कायदा

१९४७ चा शेतकरी कर्ज निवारण कायदा व १९४६ चा सावकारी कायदा हे दोन्ही कायदे आणखी कांहीं काळपर्यंत मुंबई प्रांतांत सामील व विलीन झालेल्या विभागास लागू करण्यांत येऊं नयेत अशी विनंति सदरहू विभागांतील लोकांनीं मुंबई सरकारला केली होती. सदरहू विभाग शक्यतोंवर मुंबई प्रांताचेच अविभाज्य घटक व्हावेत या दृष्टीनें तेथील कारभार प्रांतांच्या इतर भागांतील कारभारासारखाच चालावा म्हणून मुंबई प्रांतांत इतरत्र लागू असलेले सर्व कायदे या प्रदेशांनाहि लागू करावयाचे, असें सरकारचें सर्वसाधारण धोरण आहे. म्हणून उपरोक्त कायद्याची अंमलबजावणी पुढें ढकलण्यासंबंधी केलेली विनंति मुंबई सरकारनें मान्य केली नाहीं.

## २० टनी माग

यॉर्कशायरमधील एका ब्रिटिश फर्मनें २० टन वजनाचा माग तयार केला आहे. त्यावर एका वेळीं १६,००० पौंड सूत घेतां येतें. १२ फूट पन्ह्याचें कापड त्यावर विणूं शकतें. त्याचा धोटा ताशी २५–३० मैल वेगानें फिरतो.

## कराड तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन, कराड.

या संस्थेची स्पेशल साधारण सभा कराड येथें तालुका डेव्हलपमेंटचे ऑफिसमध्यें तारीख २२–५–४९ रोजीं दुपारीं २ वाजतां भरविण्यांत येईल. ह्या सभेंत संस्थेच्या पोटनियमांची दुरुस्ती नोटिशींत नमूद केल्याप्रमाणें करावयाची आहे. तरी आपण सभेस हजर राहाणेबद्दल विनंति आहे. क. ता. २०।४।४९

संभाजीराव मारुतराव थोरात,
प्रेसिडेंट.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

**–शेड्यूल्ड बँक–**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल.... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल.... | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल .... | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड.... | रु. ४,३०,००० |
| एकूण खेळतें भांडवल .... | रु. २ कोटींचे वर |

चेअरमन—श्री. धों. कृ. साठे.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

**—बँकेच्या शाखा—**

डेक्कन जिमखाना (पुणें), खडकी, मुंबई (फोर्ट, गिरगांव व दादर), नाशिक, चाळीसगांव, धुळें, जळगांव, फैजपूर (पे ऑफिस) नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर व कल्याण.

**ट्रस्टी व एक्झीक्यूटरचे कामाबाबत चवकशी करा.**

मुख्य कचेरी: लक्ष्मी रोड, पुणें २. | चिं. वि. जोग, मॅनेजर.

(पॅरेमाऊंट लि.)

## बँकिंग कंपनीज कायद्याप्रमाणें बँकेची देणें तहकुबी

### एक्सचेंज बँकेचा हायकोर्टाकडे अर्ज–रिझर्व्ह बँकेचा रिपोर्ट

बँकिंग कंपनीज कायद्याच्या ३७ (१) व्या कलमाप्रमाणें, हायकोर्ट कोणत्याहि बँकेस तिच्या अर्जावरून "मोरेटोरियम" देऊं शकते. बँक कांहीं काळ पुरती आपलें देणें देण्यास असमर्थ झाली, म्हणजे तिनें हायकोर्टाकडे अर्ज करावा व हायकोर्टास योग्य वाटल्यास, त्यानें बँकेविरुद्ध सुरू व्हावयाची किंवा चालू असलेली कारवाई कांहीं दिवस स्थगित करावी, असें प्रस्तुत कलम सांगतें. हा "मोरेटोरियम"चा एकूण काळ सहा महिन्यांपेक्षा ज्यास्त असूं शकणार नाहीं. बँकेस अशी मुदत दिली, तर ती आपली देणीं देऊं शकेल, असा रिझर्व्ह बँकेचा अभिप्राय हायकोर्टाकडे अर्ज करते वेळीं बँकेनें दाखल करावा लागतो. तथापि, असा अभिप्राय मिळण्याची वाट न पहातांहि हायकोर्ट ३७ (१) कलमाप्रमाणें मुदत देऊं शकतें; मात्र हायकोर्ट रिझर्व्ह बँकेकडून रिपोर्ट मागवून नंतर आपली मूळ ऑर्डर पक्की करतें किंवा बदलतें.

एक्सचेंज बँक ऑफ इंडिया अँड आफ्रिका लि. ला मुंबई हायकोर्टानें १८ मे १९४९ पर्यंत "मोरेटोरियम" दिला आहे. त्या तारखेपूर्वी रिझर्व्ह बँकेचा रिपोर्ट तयार होईल, अशी अपेक्षा आहे. एक्सचेंज बँकेच्या अर्जाप्रमाणें तिची जिंदगी ३,९०,००,००० रुपये असून तिचें देणें ३,३०,००,००० रुपये आहे. गेल्या तीन महिन्यांत रिझर्व्ह बँकेनें तिला ८०,००,००० रुपयांची मदत केली. बाजारांतील मंदीमुळें व गुंतविलेले पैसे तत्परतेनें उभे करण्याच्या अडचणीमुळें, बँक आपलें देणें कांहीं काळपुरतें देण्यास असमर्थ झाली, असें तिचें म्हणणें आहे.

## कुळ कायद्याविरुद्ध जमिनीची विक्री

### कुळांच्या हक्कांबाबत खुलासा

जमीनदार हे १९४८ च्या मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन कायद्याच्या ६४ व्या कलमाविरुद्ध जमिनींच्या विक्रीचे व्यवहार करीत आहेत असें मुंबई सरकारच्या निदर्शनास आलें आहे. (या कलमानें जमीन बिगर–शेतकरी लोकांना विकण्यास बंदी केलेली आहे.) या बाबतींत कायदा असा आहे कीं, जमीनदारांनीं केलेले हे व्यवहार बेकायदा आहेत अशी माहिती कुळांनीं मामलेदारास कळविण्याची जरूरी नाहीं; कारण जे व्यवहार मूलतःच बेकायदा आहेत त्यांचे बाबतींत याप्रमाणें माहिती कळविण्याचें कारण नसतें व त्यायोगें खरेदीदारास खरेदी केलेल्या मालमत्तेबाबत हक्कहि प्राप्त होत नाहीं.

कायद्याच्या ६३ व्या अथवा ६४ व्या कलमाविरुद्ध विकलेल्या जमिनीच्या बाबतींत रेकॉर्ड ऑफ राईटस्‌मध्यें नोंद करण्यांत येऊं नये अशा सूचना रेव्हेन्यू आधिकाऱ्यांना देण्यांत आल्या आहेत. तथापि कुळास आपल्या जमीनदारास जमीन विकण्यास सांगण्याचा हक्क नाहीं, कारण जमीनदारानें जमीन विकावयास काढल्यानंतरच ती प्रथम विकत घेण्याचा कुळाच्या हक्काच प्रश्न उद्भवतो. तेव्हां, अशा बाबतींत कुळापुढें एकच मार्ग आहे व तो म्हणजे कायद्याच्या ६३ (१) कलमाविरुद्ध होत असलेल्या या विक्रीकडे दुर्लक्ष करून जमिनीचा उपयोग करित राहणें. खरेदीदारास जमिनीचा ताबा मिळणार नाहीं आणि त्यानें ताबा घेतलाच तर ८४ व्या कलमाप्रमाणें त्याला जमिनींतून काढून लावतां येईल. मात्र कुळानें मूळ जमीनदारास खंड देऊं करावा.


**धी कोपरगांव पीपल्स को. ऑ. बँक लि.**

कोपरगांव, जि. अहमदनगर.

(उद्घाटन समारंभ : ता. १७–१–१९४९)

कोपरगांव येथील अत्यंत प्रतिष्ठित नागरिक यांचे देखरेखीखालीं स्थापित झालेली आणि आधुनिक पद्धतीवर बँकिंगचे सर्व व्यवहार करणारी.

**स्थानिक सहकारी बँक**

सुरुवातीचें शेअर भांडवल : ६८,७५० रु.

बिलें वसुली, हुंड्या, मुंबईवरील चेक्स, ड्राफ्टस, वगैरे व्यवहार केले जातात.

आकर्षक व्याजावर मुदतीच्या ठेवी ३ महिन्यापासून ५ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातील.

सेव्हिंग्ज बँकेंत रु. १०,००० पर्यंत व्याज देण्यांत येतें.

**विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा.**

जी. पी. ढाणेकर बी. ए. मॅनेजर | मोहनलाल कालिदास व्यास चेअरमन

स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

पॅलेस स्ट्रीट, सातारा

शाखाः—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. २१–१२–४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठेवी | रु. | ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९ ००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–१२–० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २–०–० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०–८–० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. — वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.